**ठळक बातम्या**

- जपान येत्या १० वर्षात भारतामध्ये १० ट्रिलियन येनची गुंतवणूक करणार, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यात विविध मुद्द्यांवर सहमती

- ऊर्जा कार्यक्षमता निर्देशांकांमध्ये महाराष्ट्र देशात अग्रस्थानी

- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांचं आझाद मैदानात उपोषण सुरु, मुंबईत अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी, आंदोलनाला मुदतवाढ

- थायलंडच्या प्रधानमंत्री पेतोंगटार्न शिनावात्रा, घटनात्मक न्यायालयाकडून पदच्युत

**आणि**

- BWF जागतिक बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत पी. व्ही. सिंधु पराभूत

**<><><><>**

जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी भारत आणि जपानमधील भागीदारी आवश्यक आहे, यावर दोन्ही देशांचं एकमत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज टोकियो इथं जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्यासोबत १५ व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत भाग घेतला. त्यानंतर ते संयुक्त वार्ताहर परिषदेत बोलत होते. मजबूत लोकशाही असलेले देश एक चांगल्या जगाच्या जडणघडणीच्या निर्मितीत नैसर्गिक भागीदार असतात असं ते म्हणाले. या परिषदेच्या निमित्तानं झालेली चर्चा फलदायी आणि हेतू साध्य करणारी ठरल्याचं त्यांनी सांगितलं. जपानचं तंत्रज्ञान आणि भारताची प्रतिभा ही विजेती ठरणारी युती असल्याचं ते म्हणाले.

दोन्ही देशांनी आगामी १० वर्षांत जपानकडून भारतात १० ट्रिलियन येन इतक्या गुंतवणुकीचं उद्दिष्ट ठेवलं असल्याची माहिती त्यांनी दिली.

**--- होल्ड- प्रधानमंत्री- - -**

भारत आणि जपानमधली भागीदारी केवळ दिल्ली आणि टोकियोपुरती मर्यादित राहणार नसून दोन्ही देशांमधल्या राज्ये आणि प्रांतांना परसंस्परांसोबत संस्थात्मक सहकार्याचा वाव असल्याचंही त्यांनी सांगितलं.

संरक्षण आणि सागरी सुरक्षेच्या संदर्भानं दहशतवाद आणि सुरक्षेबाबत दोन्ही देशांसमोरची आव्हानं एकसमान, त्यामुळे दोन्ही देशांनी संरक्षण उद्योग आणि नवोन्मेष विषयक परस्पर सहकार्य अधिक दृढ करायचा निर्णय घेतला असल्याची माहितीही त्यांनी दिली.

जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांनीही बातमीदारांशी संवाद साधला. भारत नवोन्मेषाच्या माध्यमातून जगात परिवर्तन घडवून आणत असल्याचं ते म्हणाले. परस्परांसाठी पूरक आणि सहकार्यपूर्ण संबंध दोन्ही देशांसाठी फायदेशीर ठरणार असल्याचं त्यांनी सांगितलं. भारताकडे मोठी बाजारपेठ असून त्यात प्रचंड क्षमता असल्याचंही ते म्हणाले.

या परिषदेदरम्यान दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला तसंच विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारीच्या पुढच्या टप्प्याच्या वाटचालीविषयी चर्चा केली. या परिषदेच्या निमित्तानं दोन्ही देशांनी अनेक करारांवर स्वाक्षऱ्याही केल्या.

या परिषदेआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जपानच्या संसदेचे अध्यक्ष आणि तिथल्या खासदारांच्या एका गटाची भेट घेतली. त्यांच्यासोबत संसदीय देवाणघेवाणीसह विविध क्षेत्रांतल्या सहकार्याविषयी चर्चा झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. यानिमित्तानं प्रधानमंत्र्यांनी, जपानचे माजी प्रधानमंत्री योशिहिदे सुगा आणि फुमियो किशिदा यांचीही भेट घेतली.

<><><><>

महाराष्ट्र हे देशात ऊर्जा कार्यक्षमतेमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणारं पहिल्या क्रमांकाचं राज्य ठरलं आहे. केंद्रीय ऊर्जा मंत्रालयानं आज राज्य ऊर्जा कार्यक्षमता निर्देशांक २०२४ जारी केला. या निर्देशांकानुसार ऊर्जा कार्यक्षमतेमध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राच्या पाठोपाठ आंध्र प्रदेश, आसाम आणि त्रिपुरा या राज्यांचा समावेश आहे. या निर्देशांकाअंतर्गत इमारत बांधणी, उद्योगक्षेत्र, नगरपालिका सेवा, वाहतूक, कृषी, वीज वितरण कंपन्या या प्रमुख क्षेत्रांसह आंतर क्षेत्रीय उपक्रमांमधल्या कामगिरीचं एकूण ६६ मानकांच्या आधारे मुल्यमापन केलं जातं.

हा निर्देशांक राज्य पातळीवर माहितीसाठ्याची देखरेख, ऊर्जा वापर व्यवस्थापनाचा मागोवा, सर्वोत्तम पद्धतींना प्रोत्साहन तसंच ऊर्जा कार्यक्षमतेल्या स्पर्धात्मक सुधारणांच्या प्रक्रियेत महत्वाचा ठरला आहे.

**<><><>**

मराठ्यांना आरक्षण मिळेपर्यंत कायदेशीर आणि लोकशाही मार्गानं आंदोलन सुरू ठेवणार असल्याचा निर्धार आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आज व्यक्त केला. थोड्याच वेळापूर्वी ते वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. सरकारकडून आंदोलनकर्त्यांची अडवणूक सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र आंदोलकांनी शांततापूर्ण मार्गानं आंदोलन सुरू ठेवावं, असं आवाहन त्यांनी केलं.

जरांगे यांनी आज सकाळी मुंबईत आझाद मैदानावर उपोषण सुरु केलं. त्यांच्या समर्थनात राज्यभरातून आलेले आंदोलक मुंबईत, फोर्ट, CSMT, चर्चगेट, पूर्व द्रुतगती महामार्ग, पूर्व मुक्त महामार्ग अशा ठिकाणी जमा झाल्यानं सर्वत्र गर्दी झाली असून वाहतूक कोंडी झाली आहे. मराठा आंदोलनामुळं पोलिसांनी ठिकठिकाणी वाहतुकीवर निर्बंध घातले आहेत. सकाळी उपोषण सुरु केल्यानंतर लगेचच मनोज जरांगे यांनी मराठा समाजातल्या नागरिकांना गर्दी कमी करण्याचं तसंच निर्धारित ठिकाणी वाहनं लावण्याचं आवाहन केलं. आंदोलकांनी पोलिसांना सहकार्य करावं, मुंबईकरांना कुठलाही त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी, असं आवाहन जरांगे यांनी केलं आहे. तरीदेखील आझाद मैदान आणि आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात आंदोलक उपस्थित आहेत.

दरम्यान, दिवसभरात विविध राजकीय पक्षांचे खासदार, आमदार आणि इतर नेत्यांनी जरांगे यांची भेट घेऊन आंदोलनाला पाठिंबा दर्शवला.

**<><><>**

दरम्यान, जरांगे यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्यासाठी मुंबई पोलिसांनी आणखी एक दिवस वाढवून दिला आहे. आधी त्यांना केवळ आज संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आंदोलनाची परवानगी देण्यात आली होती. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर कोणालाही नाराज न करता, चर्चेतून, संवैधानिक पद्धतीनं आणि न्यायालयात टिकेल, असं आरक्षण देऊ, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले.

**- - होल्ड - फडनवीस बाइट १- - -**

सरकारनं या प्रकरणी मंत्रीमंडळ उपसमिती स्थापन केली आहे. ती समिती सरकार आणि आंदोलकांशी चर्चा करुन प्रस्ताव सादर करेल. तोपर्यंत संपूर्ण आंदोलनाला गालबोट लागेल अशाप्रकारे कुणी वागू नये, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

<><><><>

थायलंडच्या घटनात्मक न्यायालयानं आज त्यांच्या प्रधानमंत्री पेतोंगटार्न शिनावात्रा यांना नैतिकतेविषयक नियमांचं उल्लंघन केल्याबद्दल पदच्चूत केलं आहे. शिनावात्रा यांना अवघ्या एका वर्षाच्या कार्यकाळानंतर पद सोडावं लागलं आहे.

<><><><>

पॅरिस इथं सुरू असलेल्या BWF जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य पूर्व फेरीच्या सामन्यात पी. व्ही. सिंधु हिला पराभव पत्करावा लागला. इंडोनेशियाच्या पुत्री वरदानी हिनं तिला पराभूत केलं. पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत आज रात्री सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांची लढत मलेशियाच्या जोडीशी होणार आहे.

<><><><>

उपराष्ट्रपतीपदाच्या आगामी निवडणुकीसाठी पाठिंबा देण्याची विनंती करणारी पत्रं सर्व खासदारांना लिहिणार असल्याची माहिती इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांनी आज दिली. मुंबईत ते वार्ताहर परिषदेत बोलत होते.

<><><><>

आज देशभर राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जात आहे. त्यामिनित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अमृत उद्यानात विविध **क्रीडा** प्रकारांमधल्या खेळाडूंना निमंत्रित करत त्यांच्याशी संवाद साधला.

<><><><>

पदकविजेत्यांचा गौरव करत आज पुण्यात आज राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. यावेळी ३३१ खेळाडूना २२ कोटी रुपयांची रोख बक्षिसं वितरित करण्यात आली. या बक्षिसांच्या माध्यमातून राज्यानं या खेळाडूंच्या मेहनतीला दाद दिली असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

//<><><><>//